RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

# शिक्षण हक्क कायद्याच्या अमंलबजावणीत शिक्षकांच्या जबाबदाऱ्या.

**सौ. साबळे विभा विजय**
(M.SC.B.ED.DSM)
श्री कोटेश्वर विद्यालय व ज्युनियर
कॉलेज गोवे. ता. जि. सातारा

**प्रस्तावना**

स्वामी विवेकानंद शिक्षकांना उद्देशून म्हणतात, ''लोकांना जर स्वतःच्या पायावर उभे राहायला शिकविले नाही तर भारतातील एखाद्या लहानशा खेड्याच्या मदतीसाठी सगळया जगाची धनदौलतसुध्दा अपुरी पडेल''. आपल्या कार्याचे स्वरूप मुख्यतः शैक्षणिक असावे. नैतिक आणि बौध्दीक असे दोन्ही प्रकारचे शिक्षंण आपण द्यावे. जर गरीब लोक शिक्षणासाठी येऊ शकत नसतील तर शिक्षणाला त्यांच्यापर्यंत पोहोचवावे.

अशाच उदात्त हेतूने प्रेरित होऊन केंद्र सरकारने सन 2002 च्या 86 व्या संविधान अधिनियमावन्वये अनुच्छेद 21 (अ) मध्ये प्राथमिक शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराचा समावेश केला आहे. त्यानुसार 6 ते 14 वर्ष वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा अधिनियम केंद्र शासनाने पारित करून तो भारत सरकारच्या 27 ऑगस्ट 2009 च्या राजपत्रात प्रसिध्द केला आहे. 1 एप्रिल 2010 पासून हा कायदा संपूर्ण भारतात (जम्मू, काश्मीर वगळता) लागू करण्यात आला. या कायद्यानुसार शिक्षण हे 6 ते 14 वर्ष वयोगटातील प्रत्येक बालकाचा मूलभूत अधिकार आहे.

**शिक्षकांच्या जबाबदाऱ्या**

1) शिक्षण हक्क कायद्याच्या अंमलबजावणीतील प्रमुख तरतूदी शिक्षकांना ज्ञात असणे. उदा.

- i) इयत्ता आठवीपर्यंत विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण करता येणार नाही.
- ii) कलम 17 प्रमाणे विद्यार्थ्यांना कोणत्याही तऱ्हेने शारीरिक वा मानसिक शिक्षा करता येणार नाही.
- iii) सर्व खाजगी शाळांमध्ये 25 टक्के जागा या उपेक्षित व गरजू कुटुंबातील बालकांसाठी आरक्षित ठेवणे आवश्यक आहे.
- iv) कलम 13 नुसार कोणत्याही शाळेस बालकाला प्रवेश देताना कोणत्याही स्वरूपात देणगी/शुल्क आकारता येणार नाही.
- v) अपंग बालकाला तो वयाची 18 वर्षे पूर्ण करेपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण देण्यात येईल (कलम 3(2))

२) समता, सामाजिक न्याय, लोकशाही आणि न्यायाचे प्रस्थापन ही मूल्ये रूजविणे.

3) अध्ययनासाठी आनंददायी शिक्षण, ज्ञानरचवाबाद सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन इ.तंत्राचा वापर करणे.

**मर्यादा**

शिक्षण हक्क कायद्यातील कलम 17 नुसार विद्यार्थ्यांना कोणत्याही पद्धतीने शिक्षा करता येणार नाही. शारीरिक शिक्षा किंवा दंड करू नये हे योग्यच आहे. पण मानसिक पातळीचा विचार करता रागावणे, वर्गातून बाहेर काढणे, उभं करणे यांसारखे शिस्त लावणे एक दिव्यच आहे. त्याबद्दल या अधिनियमात मार्गदर्शक तत्वे अंतभूत केलेली नाहीत.

**शिक्षक हक्क कायदा अंमलबजावणीत शिक्षकांची भूमिका**

'शिक्षण हक्क कायदा' हा शासनाचा प्रयत्न स्तुत्य असला तरी शिक्षकांची कमतरता, कमकुवत आर्थिक बाजू आणि केंद्र व राज्य शासनाचे आरोप–प्रत्यारोप यांतून शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी योग्य त्यागतीने होत नाही हे मान्य करावे लागेल. पण त्यातून मार्ग काढणे क्रमप्राप्तच आहे. हा मार्ग शिक्षक आणि पालक यांच्या प्रयत्नाने निश्चितच सुकर होऊ शकतो.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम हे शिक्षकांबद्दल म्हणतात “A teacher is a significant role model before a student as the society.”

### 1) शिक्षकांचे व्यक्तिमत्व

कुटुंबाच्या सुरक्षित वातावरणातून मूल बाहेरच्या जगात पाऊल ठेवते ते सर्वप्रथम शाळेत जाण्यासाठी शाळेत जाताना वाटणारी भीती हळूहळू शिक्षकांवरील विश्वासात बदलते आणि शाळा म्हणजे दुसरे घर या आस्थेने तो तेथे रूळतो. शिक्षकांची प्रत्येक कृती त्याला अनुकरणीय वाटते. शिक्षकाने शिकविलेल्या पाठ्यपुस्तकातील धड्यापेक्षा शिक्षक बोलतात कसे, राहतात कसे, वागतात कसे याचे सूक्ष्म निरीक्षण तो करीत असतो आणि त्याचवेळेस तसा घडत असतो.

याच संदर्भात एक सुंदर कविता आहे.

O, Teacher !
There is a wide – eyed little fellow
who believes you are always right,
and his eyes are always opened ,
and he watches you day and night,
you are setting an example
every in all you do
for the little boy who’s waiting
to grow up to be like you .
Anonymous

### 2) शिक्षकांचे दायीत्व

पालकांची सर्वात जोखमीची अमानत अमूल्य ठेवा – म्हणजे त्यांची मुले ते शिक्षकांकडे मोठया विश्वासाने सुपूर्द करतात. त्यांना शिक्षकांच्या विचारांची दखल घेणे महत्त्वाचे वाटते. फक्त हा विश्वास शिक्षकाने आपल्या मनात जागता ठेवून स्वतःला आपल्या कामामध्ये गुंतवून घेणे हे महत्वाचे आहे.

शिक्षण ही जन्मापासून अविरत चालणारी क्रिया आहे. शाळेतून मिळणाऱ्या औपचारिक शिक्षणाचा विचार करता असे म्हणता येईल की, शिक्षण म्हणजे येणाऱ्या पिढयांमध्ये अशी कौशल्ये प्रक्षेपित करणे, ज्याने त्यांची दैनिक उपजीविकेची कार्ये करण्याजोगे ते व्हावेत, तसेच त्या समाजातील सामाजिक, सांस्कृतिक आध्यात्मिक व तत्वज्ञानात्मक मूल्यांचे ते पाईक व्हावेत. त्या दृष्टीने शिक्षणप्रक्रियेत कालानुरूप योग्य ते बदल करणे आवश्यकच आहे. पण हा बदल करताना विद्यार्थी व शिक्षक यांना खरोखरच ज्ञान मिळेल, आनंद मिळेल असेच बदल व्हायला हवेत.

### 3) शिक्षकांची व्यवसायानिष्ठा

शिक्षण हक्क कायदयामुळे आज राजकीय, सामाजिक, शैक्षणिक अशा साऱ्या क्षेत्रांमध्ये आमूलाग्र परिवर्तन झालेले दिसून येते. आजचा विद्यार्थी स्वयंप्रकाशित व्हावा यासाठी साऱ्यांचेच प्रयत्न चालू आहेत. पाठयक्रम,शाळा, वर्ग, तासिका, मूल्यमापन या साऱ्या गोष्टी बालकेंद्रित व्हाव्यात असा प्रयत्न सुरू आहे. शिक्षणातील संकल्पना पूर्णत बालमानसशास्त्रीय दृष्टिकोनातून बदलत्या आहेत. परंतु त्या संकल्पना मूर्तस्वरूपात उतरविण्यासाठी शिक्षकांची गरज आहे ती उत्साही व चैतन्यमय शिक्षकांची ,माणुसकी जपणारा सर्वार्थाने देशाच्या प्रगतीला हातभार लावणारा विद्यार्थी शिक्षकच घडवू शकतो. अशी पिढी निर्माण करणे हे शिक्षकाचे महत्वाचे कार्य आहे. पण हे कार्य करण्यासाठी शिक्षकाचे हात सक्षम आणि मजबूत हवेत. कारण– शिक्षणाची उद्दिष्टे ,अभ्यासक्रम, मुल्यमापन पध्दती या सर्व घटकांच्या

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

अंमलबजावणीचे कार्य शिक्षकालाच करावे लागते. कोणत्याही शैक्षणिक धोरणाचे यशापयश हे बऱ्याच प्रमाणात शिक्षकावरच अवलंबून असते.

शिक्षकाचा दर्जा, त्याची व्यवसायनिष्ठा त्याची प्रामाणिक तळमळ,त्याची कार्यकुशलता आणि त्याचे प्रसन्न व्यक्तिमत्व या गोष्टी म्हणजे शिक्षणप्रक्रियेचा कणा होय.सर्व स्तरांतील घटकांसोबत शिक्षकांचा संबंध येतो आणि सर्वामध्ये मुल्यांची रूजवणूक करण्याचे काम तो करत असतो. म्हणूनच म्हणतात ना की एक व्यक्ती चुकला तर तो स्वतःचे नुकसान करून घेतो. पण एक शिक्षक जर चुकत असेल तर तो पिढी बरबाद करायला कारणीभूत ठरतो. म्हणून शिक्षक चुकता कामा नये.

ही एवढी महत्वाची भूमिका शिक्षक पार पाडत असताना व्यवसायाची निवड करताना मात्र शिक्षकी पेशाकडे शेवटचा पर्याय म्हणून पाहिले जाते. चांगल्या गुणवत्तेने उत्तीर्ण होणारे विद्यार्थी आवड किंवा व्यवसायातील प्रथम पसंती म्हणून शिक्षकी पेशाचे प्रशिक्षण घेताना दिसत नाहीत नाईलाजाने हा पेशा स्विकारणारे शिक्षक त्यातून येणारी असहायता आणि निष्क्रियता चिंताजनक आहे. उत्तम दर्जाचे शिक्षण देण्यासाठी शिक्षक स्वतः सक्षम असला पाहिजे. त्यासाठी बौध्दीक क्षमता उच्च असलेल्या विद्यार्थ्यांनी या क्षेत्राकडे स्वतः च्या आवडीने येण्याची गरज आहे. शिक्षकी पेशाला प्रथम श्रेणीतील पेशामध्ये सामील केल्याशिवाय त्याला प्रथम पसंती मिळणे अशक्य आहे.

### 4) शिक्षकांची कर्तव्यदक्षता

शिक्षकांप्रति समाजाच्या अपेक्षा वाढल्या आहेत एक चांगला शिक्षक आपल्या कर्तव्याची पूर्तता करण्यास प्रयत्नशील असतो. पण शिक्षकांवर कारकुनी काम लादुन खूप प्रगती होईल असे समजणे योग्य नाही. याशिवाय शिक्षकाना राष्ट्रीय विकासाची अन्य कामेदेखील आपली शैक्षणिक कामे सांभाळून पार पाडावी लागतात. शिक्षकांना अशैक्षणिक कामात गुंतविल्यास अध्यापनात पडणारा खंड विद्यार्थीजीवनाचे नुकसान करणारा असतो. शिक्षकांना शैक्षणिक कामांसाठी लागणारा वेळ त्यांना मिळणे न्यायसंगत आहे.

शिक्षक हा समाज व शासन यांतील दुवा आहे. नवीन धोरणातील नव्या शैक्षणिक तंत्राचा संखोल अभ्यास करून त्यांच्या अंमलबजावणीसाठी थोडे कष्ट घेण्याची तयारी उत्साही शिक्षकाने दाखविण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांप्रती प्रेम, कळवळा व व्यवसायावर निष्ठा या शिदोरीच्या भरवशावर तो शैक्षणिक क्षेत्रातील प्रत्येक अडचणीवर मात करू शकतो. शिक्षकाने सतत अध्ययनशील असावे. स्वतः कृतीशील राहून विद्यार्थ्यांना कृतीशील करणारा शिक्षक हा विद्यार्थीप्रिय तसेच समाजप्रिय होतो. शिक्षक जनजागृती घडवून आणण्यासाठी एक महत्वाचे माध्यम आहे शिक्षणक्षेत्रातील नवीन बदल आत्मसात करताना पालकांचे प्रबोधन करणे व त्यांना या प्रवाहात सामील करून घेण्याचे कामही शिक्षक करत असतो.

### 5) शिक्षकांची भूमिका

ज्ञानरचनावादानुसार शिक्षकाची भूमिका आता मार्गदर्शकाची झाली आहे. अध्ययन आणि अध्यापनातील अध्ययनाला आजच्या शिक्षणप्रणातील केंद्रस्थान आहे आणि विद्यार्थ्याने स्वयंअध्ययन करत असताना शिक्षकाने त्याचा मदतनीस म्हणून कार्य करणे अपेक्षित आहे. शिक्षण हक्क कायदयानुसार शिक्षकाने कोणत्याही तऱ्हेचा ताण किंवा शिक्षा न देता विद्यार्थ्याला सहानुभूतिपूर्वक वागणूक दयावी व किमान कौशल्याप्रत पोहोचवून पुढच्या इयत्तेत पाठवावे हे अपेक्षित आहे. हे घडवून आणण्यासाठी स्वतः शिक्षकाने जबाबदारीने प्रशिक्षण पूर्ण करणे, स्वतःचा शैक्षणिक दर्जा वाढविणे व बालमानसशास्त्रीय दृष्टीकोनातून विचार करणे आवश्यक आहे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

6) शिक्षकांचा दृष्टीकोन

The first step towards creating an improved future is developing the ability to envision it.

ही दृष्टी शिक्षकांमध्ये येण्यासाठी त्यांनी आत्मपरीक्षण करून सातत्याने स्वतःमधे सुधारणा घडवून आणणे हाच एक मार्ग आहे. 'सर्वांसाठी शिक्षण व शिक्षणासाठी सर्व' याद्वारे 6 ते 14 वर्ष वयोगटातील सर्व मुलामुलींसाठी शासनाने शिक्षणाची दारे खुली केली आहेत पण हे उद्दिष्टे साध्य करण्यासाठी गुणवत्तेच्याही सार्वत्रीकरणाची आवश्यकता आहे विद्यार्थ्याच्या सर्वांगीन विकासासाठी अनेक पूरक घटकांनी एकत्र कार्य करणे गरजेचे आहे. त्यात प्रामुख्याने पालक शिक्षक व प्रशासन या सर्वांची भूमिका महत्वाची आहे .

## सारांश

मुलांच्या सर्वांगीणवाढीसाठी शिक्षक– विद्यार्थी यांच्यात सुसंवाद असणे आवश्यक आहे आणि त्यांचे एकमेकांशी नाते आपुलकीचे असले पाहिजे. मुलाचा प्राथमिक शिक्षणाचा पाया मजबूत असेल तर तो भविष्यातील अनेक समस्यांना सामोरे जाईलच यात शंका नाही. शासनाने शिक्षण हक्क कायद्याद्वारे जी संधी मुलांना दिली आहे त्याचे सोने करण्यासाठी जबाबदारी शिक्षकांवर आहे. शिक्षणरथाच्या या दोन्ही चाकांनी आपले कार्य नेटाने पुढे नेल्यास मंगेश पाडगावकरांचा आशावाद वास्तवात येण्यास वेळ लागणार नाही.

त्यांच्याच शब्दात

जातिभेद, धर्मभेद, वंशभेद दूर
लाख लाख कंठांतूनी हाच एक सूर
करूणेच्या चरणांशी नत हो विज्ञान
पुण्यमयी दे आम्हा अक्षर वरदान
ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान
ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान!

## संदर्भ

1) अशोक खरतडे – उन्हाळी सुट्यांचा उपयोग कसा करावा? शिक्षणप्रभा, सप्टें 2012 पान.क्र. 38
2) गंगाधर वा टप्पे, राष्ट्रसंत – एक शिक्षण तत्ववेत्ता शिक्षक संदेश विशेषांक 2011 पान. क्र. 50,51
3) नीलेश कोल्हे, पवित्र देशा, शिक्षणप्रभा सप्टें 2012 पान क्र. 32